IMPACT FACTOR 5.473 (SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed E-Journal
ISSN 2455-4375

# आंबेडकरवादी कवयित्रींच्या प्रेरणा

**प्रा. सौ. सुनिता प्रदिप रंगारी**
सहाय्यक प्राध्यापक (मराठी विभाग)
मनोहरभाई पटेल महाविद्यालय,
देवरी, जि. गोंदिया
९३०७३३०४७६
sunitarangari72@gmail.com

**प्रस्तावना :—**

भारतीय समाज आणि संस्कृती शतकानुशतके चातुर्वर्ण्याच्या उतरंडीप्रमाणे चालत आली. सुरूवातीला 'वर्णाधिष्ठीत' असलेली समाजव्यवस्था अनेक शतकांच्या संक्रमणानंतर 'जात्याधिष्ठीत' झाली. रूढी, परंपरा, नितीमूल्ये या सर्वांचा विचार हा 'जात' या घटकाला आधार मानून केला जाऊ लागला.

'बामणा घरी लिवणं
कुणब्या घरी दाणं
म्हारा घरी गाणं'

या बोलीभाषेतील पदाप्रमाणेच समाजव्यवस्था शतकानुशतके चालत राहिली. शिक्षणापासून या समाजाला वंचित ठेवून सवर्णांनी दलितांना कायमच अज्ञानात ठेवले. वर्षानुवर्षे त्यांच्यावर बौद्धिक, वैचारिक आणि सांस्कृतिक गुलामगिरी लादण्यात आली.

एकोणिसाव्या शतकात ब्रिटिशांनी शिक्षणप्रसाराचे कार्य सुरू केले. जागृत झालेला नवशिक्षित तरूणवर्ग भारतीय समाज व्यवस्थेचा नव्याने विचार करू लागला. महाराष्ट्रातील या काळातील महत्वाचे समाजसुधारक म्हणजे महात्मा जोतीराव फुले. स्त्री शिक्षणाचे कार्य, विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार, बालहत्या प्रतिबंधकगृहाची स्थापना यासारख्या सामाजिक कार्याच्या माध्यमातून म. फुल्यांनी अन्याय व विषमता याविरूद्ध जनजागृतीचे कार्य केले. म. फुल्यांच्या कार्यामुळे तत्कालीन बहिष्कृत समाजामध्ये 'स्व' भानाची जाणीव झाली असली तरी देखील 'दलित साहित्य' निर्माण होण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार आणि चळवळ कारणीभूत ठरली. याचे कारण म्हणजे म. फुल्यांच्या पश्चात त्यांचे कार्य हे 'ब्राम्हणेतर विरूद्ध ब्राम्हण' या दिशेने पुढे गेले. 'ब्राम्हणेतर' म्हणतांना येथे दलित समाजाला समाविष्ट केले गेले नाही. या सामाजिक पार्श्वभूमीवर दलितांनाही 'माणूस' म्हणून जगण्याचा अधिकार आहे, हे रूढीप्रिय व कर्मठ समाजाला ठणकावून सांगण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. त्यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्यातून प्रेरणा घेऊन पुढे 'दलित साहित्य' निर्माण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार आणि चळवळ प्रेरणास्थानी असलेल्या दलित साहित्यात कविता, कथा, नाटक, कादंबरी, आत्मकथने, वैचारिक वाड्.मय अशा विविध वाड्.मय प्रकारांचा समावेश आहे.

सन १९७० नंतर दलित कवितेने आपले वेगळेपण नोंदवलेले दिसून येते. या संदर्भात नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर, दया पवार, केशव मेश्राम अशी अनेक महत्वपूर्ण नावे घेता येतील. अभावग्रस्तता आणि अपमानास्पद जीवन वाटयाला आलेले हे कवी जातिसंस्थेचे बळी होते. आज दलित कवितेने जिला आपण आंबेडकरवादी कविता म्हणू शकतो, मराठी साहित्यात स्वत:चे वेगळेपण अधोरेखित केले आहे. ही

कविता प्रस्थापित कवितेची चौकट मोडते परंतु चौकट मोडण्यासाठी दलित कविता लिहिली गेली नसून भोगलेले दु:ख, वाटयाला आलेला जीवनानुभव, जातिसंस्थेने केलेले शोषण, दारिद्रय, रूढीग्रस्तता, अंधश्रद्धा, लाचारी, इत्यादी अनेकविध पेच अभिव्यक्त करण्याच्या अपरिहार्य गरजेतून ही निर्मिती झाली आहे. प्राचीन काळातही अशी कविता निर्माण झाल्याची आपल्याला दिसते. स्त्रीयांवर होणाऱ्या अन्याय–अत्याचारांना ती प्रत्यक्षपणे वाचा फोडत नसली तरी त्याबद्दलची खंत त्यांच्या काव्यातून व्यक्त होतांना दिसते. संत जनाबाई, संत मुक्ताबाई, संत सोयराबाई यासारख्या संतपरंपरेत मोडणाऱ्या परंतु तत्कालीन समाजव्यवस्थेत शूद्र गणल्या गेलेल्या स्त्रीयांनी अतिशय सकस व जोरकस कविता लिहिलेली दिसते.

स्त्री जन्म म्हणून न व्हावे उदास ।
साधुसंता ऐसे केले जनी ।।

यामध्ये जनाबाईने आपल्या मनातील स्त्रीपणाचे–दासीपणाचे शल्य प्रकट केले आहे. जवळपास सर्वच संत कवयित्रींनी अशी भावना आपल्या काव्यातून व्यक्त केलेली दिसते.

**स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील दलित कवयित्रींची कविता :–**

१९६० नंतर दलित कवयित्री लिहितांना दिसतात. परंतु यापूर्वीच्या साहित्यातूनही दलित जाणीव व्यक्त करणारी, विशेषत: 'स्त्री' जाणीवा व्यक्त करणारी कविता लिहीलेली दितसे. दलित कवितेचे विशेष सांगतांना डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, ''सूक्ष्म, अंतर्मुख व आशयसंपन्न आहे. नवनव्या प्रतिभा व मिथ्समधून ती घडत आहे. ती मागीलांचे केवळ अनुकरण करीत नाही तर स्वतेजाने प्रकाशण्याचा प्रयत्न करीत आहे. उपरोधासारखे अत्यंत प्रभावी माध्यम आता तिने स्वीकारले आहे. कथासूत्राचे रूपही तिने धारण केले आहे. वर्णनपरतेपेक्षा किंवा हातवारे करण्यापेक्षा आत ती आत्मपरीक्षण व चिंतनशीलतेकडे झुकली आहे.''[१]

डॉ. आंबेडकरांनी उभारलेले लढे, केलेली आंदोलने, त्यातून उभा राहिलेला सामाजिक व सांस्कृतिक संघर्ष दलित लेखक कवींच्या साहित्य निर्मितीसाठी प्रेरक ठरला. दलित ऐवजी 'आंबेडकरवादी' हे विशे  नाम त्यामुळेच रूढ होऊ लागले. दलित कवयित्रींची काव्यनिर्मितीही याला अपवाद नाही. राज ढाले यांनी दलित साहित्याला 'फुले–आंबेडकर' प्रेरणेचे साहित्य म्हटले आहे. याबद्दल भाष्य करतांना ते म्हणतात, ''आपणाला जग काय म्हणतंय, काय म्हणून ओळखतंय यापेक्षा आपण कोण आहोत आणि आपण कोण होतो यापेक्षा आपणाला कोण व्हावयाचे आहे याचा शोध घेऊन आपलं नाव आपणच मुक्रर केलं पाहिजे आणि म्हणूनच अपला आदर्श मनू हाच असेल तर त्याचीच सामजरचना शिरोधार्य मानून आपण स्वत:ला 'दलित' या अवस्थेशी निबद्ध केलं पाहिजे. अन्यथा तिच्यातून बाहेर पडायचं असेल तर, मुक्त व्हायचं असेल तर आपणाला मुक्तिपथावर नेणाऱ्या साहित्यप्रवाहाचं नाव 'फुले आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य' असंच असलं पाहिजे.''[२]

डॉ. गंगाधर पानतावणे दलित साहित्याची प्रेरणा सांगतांना आंबेडकर विचार हाच दलित साहित्याचा प्रेरणास्त्रोत अशी आग्रही भूमिका घेतांना म्हणतात, ''आंबेडकर विचार हा मानवी स्वातंत्र्याचा उद्‌गार आहे. जगात जेथे जेथे सामाजिक गुलामगिरी व पारतंत्र्य आहे, तेथे हा विचार एखाद्या झंझावातासारखा येतो. आंबेडकर विचार पोथीनिष्ठा नाकारतो आणि विज्ञाननिष्ठा स्वीकारतो. आंबेडकर विचार देव, दैव नाकारतो आणि दास्यमुक्तता स्वीकारतो. आंबेडकर विचारांचा विद्रोह आहे. विषमतेशी, विद्वेषाशी, वर्णवादाशी, उच्चनीचतेच्या कृत्रिम कल्पनांशी आंबेडकर विचारांचा विद्रोह आहे. मानसिक गुलामगिरीशी, स्वार्थांध

धर्मग्रंथांशी, माणसाचे विभाजन करणाऱ्या क्रूर अनीतीशास्त्रांशी. म्हणूनच दलित साहित्याचा प्रेरणास्त्रोत आहे आंबेडकर विचार.''[३]

१९ व्या शतकात महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात जातिअंताची चळवळ/अस्पृश्यता निर्मूलन आणि स्त्री–सुधारणा या महत्वाच्या चळवळी उदयास आल्या. या तीनही सामाजिक चळवळींच्या संदर्भात म. फुले आणि सावित्रीबाई फुलेंचे योगदान अतिशय मोलाचे आहे. सावित्रीबाई फुले या आद्यशिक्षिका, पददलितांच्या कैवारी आणि प्रौढ शिक्षणाच्या पुरस्कर्त्या म्हणून ओळखल्या जातात. डॉ. मा. गो. माळी यांच्या 'सावित्रीबाई फुले समग्र वाड्.मय' या ग्रंथामुळे सावित्रीबाईंच्या इतर लेखनाबरोबरच सावित्रीबाईंचे काव्यही जगासमोर आले. डॉ. माळी यांनी संपादित केलेल्या या ग्रंथात सावित्रीबाईंचे दोन कवितासंग्रह अनुक्रमे 'काव्यफुले' (१८५४) आणि 'सावित्री जोतिबा विरचित बावणकशी सुबोध रत्नाकर' (१८९७) प्रसिद्ध झालेले आहेत. या काव्याच्या आधारे त्यांनी सावित्रीबाईंचा उल्लेख 'सावित्रीबाई फुले: आद्य आधुनिक विद्रोही कवयित्री'[४] असा केला आहे.

वयाच्या २३ व्या वर्षी म्हणजेच १८५४ साली सावित्रीबाईंचा पहिला कवितासंग्रह प्रकाशित झाला. या संग्रहाचे महत्व सांगतांना डॉ. मा. गो. माळी म्हणतात, ''सावित्रीबाईंचा पहिला काव्यसंग्रह ज्या काळात (इ.स. १८५४ मध्ये) प्रसिद्ध झाला; त्या काळात समकालीन अशी एकही कवयित्री झाल्याचे दिसून येत नाही. उपेक्षितांच्या जागरणांचा व समाजसुधारणेचा विषय सामाविष्ट झालेली काव्यरचना म्हणजे सामाजिक आणि साहित्यक्षेत्रातील क्रांतीच होय, हे मान्य करावे लागेल.''[५] आपल्या उपदेशपर कवितेतून सावित्रीबाई म्हणतात,

'शूद्र–अतिशूद्र । दु:ख निवाराया
इंग्रजी शिकाया । संधि आली
इंग्रजी शिकूनि । जातिभेद मोडा
भटजी भारूडा । फेकुनिया ।।'[६]

'काव्यफुले' या संग्रहात सावित्रीबाई आधुनिक शिक्षण देणाऱ्या ब्रिटिशांचा उल्लेख 'इंग्रजी माऊली' असा करतात. 'शिकणेसाठी जागे व्हा' या कवितेत त्या म्हणतात,

'गेले मेले मनु पेशवे आंग्लाई आली
बंदी मनुची विद्या घेण्या होती ती उठली ।।
ज्ञानदाते इंग्रज आले विद्या शिकुनि घ्या रे
ऐसी संधी आली नव्हती हजार वर्ष रे ।।[७]

आपल्या या काव्यरचनेचे श्रेय सावित्रीबाईंनी जोतीरावांना दिले आहे. अर्थात सावित्रीबाईंच्या काव्याची प्रेरणा जोतीराव फुले आहेत, हे स्पष्ट होते. १९६० नंतर निर्माण झालेल्या दलित साहित्य चळवळींच्या भूमिकेशीही जोतीबांचे नाते सांगणारे आहे.

**आंबेडकरवादी कवयित्रींची कविता :–**

१९७० पासून ते आजपर्यंतच्या दलित स्त्रीच्या काव्यनिर्मितीच्या प्रेरणांचा विचार करतांना जवळपास चाळीस वर्षांच्या प्रदीर्घ कालपटावरील दलित स्त्री, कविता या वाड्.मय प्रकारांकडे पाहण्याची तिची दृष्टी, कविता लेखनासाठी प्रेरक ठरणाऱ्या घटना, घडामोडी, काव्यातून व्यक्त होणारे विचार इत्यादीचा आढावा घेणे महत्वाचे ठरते. फुले–आंबेडकरांचा क्रांतिकारी विचार हे दलित साहित्यप्रवाहाचे प्रमुख निर्मिती केंद्र

आहे. अनेक कवयित्रींनी कवितासंग्रहातील मनोगताच्या निमित्ताने परिवर्तनवादी विचार आणि चळवळ हीच आपली लेखनप्रेरणा असल्याचे नमूद केले आहे. या सर्व कवयित्रींच्या प्रेरणांमध्ये काही समान सूत्रे आढळतात. यातील महत्वाचा घटक म्हणजे फुले–आंबेडकरांचा मानवमुक्तीचा विचार होय. सुगंधा शेंडे आणि हिरा बनसोडे या कवयित्री वगळता बहुतांश कवयित्रींचा जन्म स्वातंत्र्योत्तर काळातील आहे.

भारतीय पुरूषप्रधान संस्कृतीने स्त्रीला कायम दुय्यम स्थान दिलेले आढळते. त्यातही दलित स्त्री चे 'स्त्री' असणे हे तिच्या शोषणासाठी आधारभूत घटक ठरले. डॉ. बाबासाहेबांनी स्त्रीमुक्तीसाठी केलेल्या प्रयत्नांमुळे आणि स्त्रीला दिलेल्या सांविधानिक अधिकारामुळे पूर्वीइतके शोषण होत नसले तरी छुप्या मार्गाने या स्त्रीयांना जातीय मानसिकतेचे बळी पडावे लागते. बौद्धिक, वैचारिक, मानसिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा अनेकविध पातळयांवरील 'दलित स्त्री' ची कुचंबना कवितेतून जेंव्हा व्यक्त होते तेव्हा जातीय मानिसकता आजही तितकीच चिवट आहे, याची जाणीव प्रकर्षाने होते.

१९७० पासून सातत्याने काव्यलेखन करणाऱ्या कवयित्री हिरा बनसोडे आपल्या काव्यलेखनाची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर असल्याचे सांगतात. आपल्या फिर्याद या काव्यसंग्रहाच्या मनोगतात त्या म्हणतात, ''मी कार्यकर्ती नाही. कुठल्याही चळवळीशी माझा प्रत्यक्ष संबंध नाही. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीशी माझे अतूट नाते आहे. या चळवळीने मला घडविले आहे. बाबासाहेबांनी दिलेल्या उजेडाच्या फुलांचे दिवे करून मी प्रगतीचा मार्ग शोधत आहे.''[८]

कवयित्री संध्या रंगारी आपल्या 'आघात' या पहिल्याच काव्यसंग्रहात आपल्या काव्यप्रेरणेबद्दल सांगतांना म्हणतात, ''क्रांतिवीर ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन ज्ञानाचे पंख फुटले आणि नवचैतन्य घेऊन दु:खित शोषिताच्या विश्वात भराऱ्या मारू लागले. त्याच्या दु:खांना कुरवाळू लागले. अश्रूंनी न्हावू लागले आणि पाहता पाहता माझ्या अश्रुंनी पेट घेताला.''[९]

प्रज्ञा दया पवार, उषाकिरण आत्राम, शांताबाई पवार, माया दामोदर, उर्मिला पवार, संध्या तांबे, नंदा तायवाडे, लता ऐवळे, अनिता भावसार, अशा अनेक कवयित्री 'आंबेडकरवादी' जाणीवेतून सातत्याने काव्यलेखन करीत आहेत. पुरू षप्रधान जात्याधिष्ठीत सामजरचनेत आपल्या जबाबदाऱ्या पार पाडत असतांनाच आधुनिकीकरणामुळे, जागतिकीकरणाच्या रेटयामुळे बदलणाऱ्या आर्थिक समीकरणांना सामोरे जातांना अनेक प्रकारच्या आव्हानांना त्यांना सामोरे जावे लागते. त्याचे सखोल असे प्रतिबिंब त्यांच्या काव्यातून उमटलेले दिसते. 'फिनिक्स' ही प्रतिमा अनेक आंबेडकरवादी कवी आणि कवयित्रींनी वापरलेली दिसते. राखेतूनही उंच झेप घेणाऱ्या फिनिक्स पक्षासारखे आयुष्य जगण्याची प्रेरणा आंबेडकरांच्या विचारांतून 'फिनिक्स' या कवितेत म्हणतात,

> 'विद्रोहाची मशाल घेऊन
> प्रस्थपितांच्या बालेकिल्यात
> देऊ या पेटवून..............
> रीती–रूढींच्या या
> दिखाऊ परंपरेला
> देऊ या एक हादरा
> आणि.............
> त्या उध्वस्त ढिगाऱ्यावरच

उभारू .............
परिवर्तनाचा भक्कम पाया ........ नवा ।
परिवर्तनाचा भक्कम पाया ........ नवा ।'

**आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतील आशयसूत्रे :–**

आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतील आशयसूत्रे स्पष्ट करतांना, ही कविता परंपरांना छेद देणारी आंबेडकरप्रणीत मानवमुक्तींचा आविष्कार करणारी कविता असल्याचे लक्षात येते. केवळ स्वत:चे दु:ख, वेदना यांना या कवितेत स्थान नाही; तर शेतकरी आत्महत्या, स्त्रीयांचे विविध पातळयांवरचे प्रश्न, दलित चळवळीची ताटातूट, ग्रामीण जीवनाचे प्रश्न अशा अनेक समुहनिष्ठ प्रश्नांना ही कविता हात घालते. फुले–आंबेडकरांचा परिवर्तनवादी विचार स्वीकारलेल्या या कवयित्री हिंदुधर्माने लादलेली संस्कृती, रूढी–परंपरा, ग्रंथप्रामाण्य, शब्दप्रामाण्य आणि यावर आधारलेली मानसिक, वैचारिक आणि सांस्कृतिक गुलामगीरी नाकारतात आणि मानवी मूल्यांचा स्वीकार करतात.

कवयित्री सुगंधा शेंडे आपल्या एका कवितेत लिहितात,

'फेक तुझी ती काठी तल्लठी कृष्णवर्णी घोंगडे
धर हात मुलाचा नेई तयाला गाव शळेकडे ;
असोत अंगावरती चिंध्या खाईना का कण्याभाकरी,
घरात उजळीन दीप ज्ञानमय बोल घुमू दे ह्रदयांतरी.....'[१०]

डॉ. आंबेडकरांच्या 'शिका; संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश या कवितेतून चित्रित झालेला दिसतो.

फुले आंबेडकरांच्या विचारक्रांतीतून केवळ अस्पृश्य समाजालाच प्रेरणा मिळाली, असे नव्हे तर जंगलात उपेक्षेचे जीवन जगणाऱ्या आदिवासी समाजानेही त्यांच्या विचारातून प्रेरणा घेऊन आपले 'माणूस' असण्याचे हक्क अधोरेखित केलेले दिसतात. याच विचारातून उषाकिरण आत्राम आपल्या कवितेत म्हणतात,

''अंधारातील धुलीकणांचे
सुवर्ण तू केले
मुक्या आंधळया पंगुनाही
जीवन तू दिले
सागर–धरती–नील नभाहुन
महान तवं गाथा
सूर्य नगरीच्या हे भीमराया [११]

बाबासाहेबांच्या 'संघटित व्हा' हा विचार, चळवळीसाठी किती महत्त्वाचा आहे, हे अधोरेखित करतांना मालती इंगळे म्हणतात,

''जेथे जेथे वादळी प्रश्न आहेत
उत्तरे वादळी मिळणार आहे
लहान सहान वावटळी वादळांनो
एकीचे वादळ होऊन घोंघवायचे आहे.......[१२]

समुहनिष्ठ जाणीवांचा आविष्कार करतांना हे 'एकीचे बळ' आवश्यक आहे, असे कवयित्री सुचविते. डॉ. आंबेडकरांच्या क्रांतीकारी विचारांची ध्वजा खांद्यावर घेऊन कवयित्री खडकाळ प्रदेशातला प्रवास करण्यास साध्य होते. माणसाचे माणूसपण जपले जावे, एवढीच त्यांची इच्छा आहे. तेच त्यांचे स्वप्न आहे. या स्वप्नपूर्तीच्या वाटेवर चालतांना कवयित्री संध्या रंगारी म्हणते –

'चल दोस्ता
आशावाद अन् विश्वास घेऊन
ओसाड खडकाळ
माळरानच गाठू
तुझ्या–माझ्या डोळयातलं
निळं स्वप्न पेरू
माणसांसाठी नवा
वेरूळ अजिंठा कोरू'[१३]

जागतिकीकरणाने जगातल्या सर्वच स्तरातल्या माणसांसमोर जगण्याचे प्रश्न निर्माण करून ठेवलेले दिसतात. 'खाऊजा' च्या रेटयात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिकदृष्टया मागे असणाऱ्या माणसांसमोरही सारखेच प्रश्न निर्माण झालेले दिसतात. पण तरीही आपली ठाम भूमिका तो सोडत नाही. यावर भाष्य करतांना प्रज्ञा पवार म्हणते –

'तो वाढतोय नवयानात
जगतोय ग्लोबल पसाऱ्यात
मॅकडोनाल्ड, पिझ्झा–हट, सीसीडी
मल्टिप्लेक्स, आयपॉड,
सायबर कॅफेच्या जंजाळातही

.....................................
मी अंतर्बाहय भरून पावते
वाढतच जाते तू ओढलेली रेघ पुढे पुढे.........
आणखी पुढे'[१४]

स्त्री–पुरूष यांच्यातील सुसंवाद हे मानवी जीवनाचे सौंदर्य आहे. परंतु स्वतःच्या पुरूषी अहंकारात पुरूष स्त्रीकडे केवळ शरीर म्हणून पाहतो.

अनादी काळापासून पुरूषव्यवस्थेला बळी पडणाऱ्या स्त्रीने आतातरी आपल्या माणूसपणासाठी लढले पाहिजे; विद्रोह केला पाहिजे, पिंजरा तोडून बाहेर आले पाहिजे हे सांगतांना कवयित्री म्हणते –

'ठिणगी पडली की आग भडकते
पण त्या आगीला तू भिऊ नकोस
त्या आगीतून निघालेल्या ज्वालांकडे बघ
म्हणजे तुला दिशा गवसेल'[१५]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, या 'युगंधरा'ला केंद्रस्थानी ठेवून, त्यांच्या क्रांतीप्रवण, मानवतावादी विचारांतून प्रेरणा घेऊन जातीच्या उतरंडीत सर्वात खालच्या पायरीवर ढकलल्या गेलेल्या स्त्रीयांनी

'आंबेडकरवादी' विचारसरणी आत्मसात करून, आपल्या समुहमनाच्या वेदना, विद्रोह काव्यातून प्रकट केलेले दिसतात.

'हे युगंधरा
तू करून दिलीस
जाणीव गुलामगिरीची म्हणून नाकारतेय अंधारवास
हे युगंधरा
तू झालास माझा श्वास
म्हणून घडेल आता नवा इतिहास.'[१६]

नवीन इतिहास घडवण्याचे स्वप्न पाहणारी ही कवयित्री आंबेडकरी विचारांचा वारसा जपण्याचे कार्य करणारी आहे. आंबेडकरावादाशी तिची नाळ जोडली गेली आहे. एक 'स्त्री' म्हणून नव्हे तर एक माणूस म्हणून जगण्याचे बळ तिला आंबेडकरी विचारातून मिळाले आहे.

आंबेडकरी प्रेरणेतून लेखन करणाऱ्या १९ कवयित्रींचा एक प्रतिनिधिक कवितासंग्रह 'आभाळ पेलताना' २०१८ मध्ये प्रकाशित झाला. प्रा. आशालता कांबळे यांच्या 'प्रभा' प्रकाशनाने हा संग्रह प्रकाशित केला आहे. उषा अंभोरे व शारदा नवले यांनी कवितांची निवड व संपादन केलेले आहे. या संग्रहाचे वैशिष्टय म्हणजे अक्षरजुळणीपासून मुद्रणापर्यंत सर्व जबाबदारी स्त्रीयांनीच पेललेली आहे. जवळपास तीन पिढयांतील कवयित्रींच्या कवितांचा यात समावेश आहे.

'ज्योती—सावित्रीने घडविलेली
मी एक आधुनिक स्त्री
बाबासाहेबांनी बहाल केलेल्या
बौद्ध तत्वज्ञानातील
'स्त्रीत्वा' ला ओलांडून
माणूसपणाला साद घालणारी'

आशालता कांबळे यांच्या 'बाईपणाची किंमत; या कवितेतील ओळी म्हणजे आंबेडकरवादी कवयित्रींच्या प्रेरणांचा लेखाजोखा आहे, असे म्हणता येईल. जोतीराव, सावित्रीबाई, बाबासाहेब यांच्या विचारांनी घडलेली आजची आधुनिक स्त्री ही माणूसपणाच्या प्रदेशाकडे निघाली आहे.

**निष्कर्ष :—**

१. म. जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतूनच आंबेडकरवादी कवयित्री घडली आहे.
२. आंबेडकरवादी कवयित्रीने जुनाट प्रथा—परंपरा व तिला अबला ठरवणाऱ्या सगळया पुरूषी वर्चस्वाच्या भ्रमांना सुरूंग लावून मानवमुक्तीच्या प्रदेशात प्रवासाला सुरूवात केली आहे.

**संदर्भ सूची :—**

१. विद्रोहाचे पाणी पेटले आहे, डॉ. गंगाधर पानतावणे, विजय प्रकाशन, नागपूर, १९७६, पृष्ठ ६३
२. 'अस्मितादर्श', एप्रिल—मे—जून १९९५, पुणे येथील २१ व्या 'अस्मितादर्श' साहित्य मेळाव्यातील राजा ढाले यांचे अध्यक्षीय भाषण.

३. साहित्य : शोध आणि संवाद, डॉ. मनोहर जाधव (संपा.), सुविधा प्रकाशन, पुणे, ऑगस्ट २०००/पृ. ३३
४. समजाप्रबोधन पत्रिका, जुलै–डिसेंबर २००९
५. सावित्रीबाई फुले–समग्र वाड्.मय, डॉ. मा. गो. माळी (संपा.), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, दु.आ. मार्च १९९८ पृ. ३९
६. उनि, पृ. २३
७. उनि, पृ. २४
८. फिर्याद, हिरा बनसोडे, समाज प्रबोधन संस्था, पुणे, मार्च, १९८४, मनोगत
९. आघात, संध्या रंगारी, शब्ददान प्रकाशन, नांदेड, ६ डिसेंबर १९९२, पृ. २०
१०.अग्निशिखा, सुगंधा शेंडे, वासंती हिररेखण, नागपूर, १५ एप्रिल १९८९ पृ. २९
११.म्होरकी, उषाकिरण आत्राम, गोंडवाना गोंडी साहित्य परिषद, नागपूर २२ फेब्रुवारी १९९७, पृ. ३८
१२.निळे आकाश माझे आहे, डॉ. मालती इंगळे, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, २८ ऑक्टोबर २००७, पृ. क्र. ७३
१३.संध्यारंग, संध्या रंगारी, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, जानेवारी २०१०, पृ. १६२
१४.मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा, प्रज्ञा लोखंडे, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई जानेवारी २००७ पृ. ५८
१५.इहवादी साहित्याची पूर्वदिश, डॉ. यशवंत मनोहर, स्त्रीच्या अत्तदीपत्वासाठी उठाव, सुगसाक्षी प्रकाशन, ऑक्टोबर – २०१२, पृष्ठ – २८९
१६.मुद्रालेख, उषा हिंगोणेकर, सुविद्या प्रकाशन, पुणे, नोव्हेंबर १९९९, पृ. १४